# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 14 एप्रिल 1991
**स्थळ** : महाराष्ट्र हायस्कूल, डिलाईल रोड, मुंबई – 400 013.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. | 9. |
| 2. | 10. |
| 3. | 11. |
| 4. | 12. |
| 5. | 13. |
| 6. | 14. |
| 7. | 15. |
| 8. | 16. |

फळसेवाडी परस्पर हितकारी संस्था या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 14 एप्रिल 1991 रोजी सायंकाळी 5:00 वाजता महाराष्ट्र हायस्कूल, डिलाईल रोड, मुंबई – 400 013 येथे झाली. अध्यक्षस्थानी माननीय श्री वासुदेव बाबू राणे हे होते. सभेला सुरवात होण्यापूर्वी खालील मृतात्म्यांना दोन मिनीटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

1) कै दिनकर बाबाजी राणे, 2) कै सरस्वती विष्णु साटम, 3) कै चंद्रभागा रामचंद्र साटम, 4) कै रिना रविंद्र राणे, 5) कै मनीषा यशवंत सावंत 6) कै मनीषा महादेव राणे

याउपर कोणाचे नाव राहिल्यास क्षमस्व.

नंतर सभेस कार्यक्रम पत्रीकेप्रमाणे रितसर सुरवात होऊन संस्थेचे चिटणीस श्री प्रताप विठोबा राणे यांनी कार्यक्रम पत्रीकेचे वाचन केले व त्यानंतर मागील इतिवृत्त (दिनांक 01 मे 1988) वाचन करुन व ते इतिवृत्त सभाग्रहाने मंजूर केले.

त्यानंतर कार्यक्रम पत्रीकेच्या दुसऱ्या मुद्याप्रमाणे कार्यकारीणी मंडळाची निवड झाली. अध्यक्ष स्थानासाठी श्री रमेश रघुनाथ राणे व श्री दत्ताराम विष्णु साटम यांची नावे सुचित करण्यात आली परंतू त्यांनी स्वत:हून कार्यबाहुल्यामुळे नकार दिला. पुढे श्री प्रताप विठोबा राणे यांची एकमताने निवड करण्यात आली.

**<u>कार्यकारीणी व पदाधिकारी यांची नावे खालीलप्रमाणे –</u>**
**<u>पदाधिकारी</u>**

1) श्री प्रताप विठोबा राणे — अध्यक्ष
2) श्री रामकृष्ण भगवान राणे — उपाध्यक्ष
3) श्री सुनिल सदानंद राणे — चिटणीस

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(03 to 06)

4) श्री उदय भगवान राणे खजिनदार

**<u>कार्यकारिणी सदस्य</u>**

1) श्री वसंत भिकाजी राणे
2) श्री मधुसूदन श्रीधर राणे
3) श्री सुरेश रघुनाथ राणे
4) श्री गंगाराम महादेव राणे
5) श्री रमेश रघुनाथ राणे
6) श्री पांडूरंग सावजी राणे
7) श्री शंकर बाळकृष्ण राणे
8) श्री दिलीप मधुकर राणे

नविन कार्यकारी मंडळास मार्गदर्शन करण्यासाठी ह्या वर्षी प्रथमच सल्लागार हे पद निर्माण करण्यात आले. ह्या पदासाठी श्री अविनाश कृष्णाजी राणे आणि श्री दत्ताराम विष्णु साटम यांची निवड करण्यात आली.

ह्यानंतर वाडीतील पाणी प्रश्नावर गंभीर चर्चा करण्यात आली. नळ योजनेवर देखील बरीच साधक-बाधक चर्चा करण्यात आली. पुरेशा पाण्याअभावी नळयोजना राबविता येणार नाही असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. नंतर विहीर बांधणे या विषयावर चर्चा करण्यात आली. श्री प्रताप विठोबा राणे आणि श्री वामन श्रीधर राणे यांनी विहिरीचे पाणी कुठे मिळेल याबद्दल माहीती दिली. परंतू असे ठरले की एकाच पाणी दाखविणाऱ्या माणसावर विश्वास न ठेवता गावी जाऊन आणखी दोन-चार माणसांकडून पाण्याची (विहीरीची) जागा निश्चित करावी असा विचार श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी मांडला व त्यास सर्वांनी अनुमति दिली. श्री वामन श्रीधर रावराणे यांनी आपल्या कंपाऊन्ड मधील जागा विहीर बांधतअसतील तर विनाअट, विनामोबदला देण्याची तयारी दाखविली. मुळ मालक श्री अविनाश कृष्णाजी राणे, श्री मधुकर संभाजी राणे, श्री रमेश रघुनाथ राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे, या सर्वांनी त्यास विनाअट पाठींबा दिला. पुढे विहीर बांधण्यासाठी निधी कसा जमविणार याच्यावर चर्चा करण्यात आली, या चर्चेत मुख्यत्वे श्री मधुसूदन श्रीधर राणे, श्री वासुदेव बाळकृष्ण राणे (अध्यक्ष), श्री वामन श्रीधर राणे, श्री भगवान रामचंद्र साटम, श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी भाग घेतला. श्री मधुसूदन श्रीधर राणे यांनी प्रत्येक नोकरदाराकडून रु.500/- याप्रमाणे वर्गणी घ्यावीअसे सांगितले. श्री प्रताप विठोबा राणे यांनी स्मरणीका काढून त्यायोगे पैसे उभे करण्याचे सांगितले. तसेच या स्मरणीकेच्या उद्‌घाटना प्रसंगी (प्रकाशनाप्रसंगी) निमित्ताने वाडीतील सर्व कुटूंबियांचे एक स्नेह संमेलन घेण्यात यावे व प्रत्येक नोकरदाराकडून (स्त्री / पुरुष) सभासद / सभासद नसले तरी रु.100/- देणगी घेण्यात यावी. या वर्गणीतून अल्पोपहार व आपणांस हुषार मुलांचा सत्कार करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला. उरलेली रक्कम विहीरीसाठी खर्च करावी. तसेच संस्थेच्या जमा रक्कमेतून देखील काही भार उचलला जातो की नाही ते पाहावे. ही रक्कम (देणगी) संस्थेच्या कार्यकारीणीने 30 जून 1991 पर्यंत जमा करावी. तसेच ज्यांना आपल्या पुर्वजांच्या नावे वेगळी देणगी दयायची असेल तरी देखील स्विकारण्यात येईल व ती कार्यकारी मंडळाने स्विकारावी. व अश्या वेगळ्या देणगीदारांची नावे स्नेहसंमेलना दिवशी सभाग्रहामध्ये प्रसिध्द करण्यात येतील. अश्या प्रकारे पत्रक काढण्याचा हक्क कार्यकारीणीस देण्यात आला. यावेळी सभासद वर्गणी गोळा करण्यात आली. तत्पूर्वी नवनिर्वाचीत चिटणीस श्री सुनिल सदानंद राणे यांनी आजी-माजी कार्यकारीणीची बैठक 20 एप्रिल 1991 रोजीअध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांच्या घरी संस्थेच्या पुढील कामकाजासाठी बोलविली.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(03 to 06)

यानंतर श्री वासुदेव बाळकृष्ण राणे यांनी गेली तीन वर्षे अध्यक्ष म्हणून काम करण्यास सहकार्य दिल्याबद्दल सर्व सभासदांचे आभार मानले.

तसेच संस्थेचे चिटणीस श्री प्रताप विठोबा राणे यांनी सभाग्रहाचे व माजी पदाधिकारयांचे, उपस्थितांचे आभार मानून 7:30 वाजता सभा संपल्याचे घोषित केले.

---

| | |
|---|---|
| श्री सुनिल सदानंद राणे | श्री रामचंद्र भगवान राणे |
| चिटणीस | उपाध्यक्ष |